MMRC

## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

मुं.मे.रे.कॉ व एफ.डी.सी.एमद्वारे वृक्षारोपण मोहिमेस प्रारंभ; मियावाकी पद्धतीने करणार ९००० झाडांची लागवड

मुंबई, ७ जून, २०२१ - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) व फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉपोरेशन ऑफ महाराष्ट्र (एफडीसीएम) यांच्या संयुक्त विद्यमाने मियावाकी पद्धतीने वृक्षारोपण करण्यास आज पासून प्रारंभ झाला. या पर्यायी वृक्षारोपणा अंतर्गत मुंबई येथील गोरेगाव परिसरातील इनॉर्बिट मॉल जवळ सुमारे ३००० चौ.मि. भूखंडावर ९००० झाडांचे रोपण केले जाणार आहे.

या मोहिमेत विविध स्थानिक प्रजाती जसे काथ, कडुलिंब, आवळा, बकुळ, सीता अशोक, चिंच, अर्जुन, बदाम, शिसव, नारळ, आंबा, सुपारी, कांचन, बेल इत्यादी वृक्षांचे रोपण करण्यात करण्यात येणार आहे.

यासंबंधी प्रतिक्रिया देताना मुं.मे.रे.कॉ.चे व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजित सिंह देओल म्हणाले, “या पर्यायी वृक्षारोपणा अंतर्गत एफ.डी.सी.एमच्या सहाय्याने मियावाकी पद्धतीचा वापर करत अत्यल्प कालावधीत घनदाट वन निर्मिती केली जाणार आहे ही निश्चितच आनंदाची बाब आहे. पुढील जागतिक पर्यावरण दिनापर्यंत या झाडांचे पूर्णतः विकसित वनामध्ये रुपांतर होणे अपेक्षित आहे".

"या अंतर्गत एकूण ९००० विविध स्थानिक प्रजातींची झाडांचे रोपण पुढील तीन महिन्यात केले जाणार असून एफ.डी.सी.एम द्वारे पुढील दोन वर्ष या झाडांचे संवर्धन देखील केले जाणार आहे" असे मुं.मे.रे.कॉ.चे कार्यकारी संचालक श्री आर रमणा म्हणाले.

यावेळी श्री पी टी मोरणकर, प्रादेशिक व्यवस्थापक, एफडीसीएम नाशिक विभाग, श्री अजय फुलमाळी वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक, मुं.मे.रे.कॉ, श्री संदिप सोहोनी, पर्यावरण वैज्ञानिक,मुं.मे.रे.कॉ, श्रीमती रश्मी कदम पर्यावरण वैज्ञानिक, मुं.मे.रे.कॉ, श्री योगेश कदम हॉटीकल्चरिस्ट मुं.मे.रे.कॉ इत्यादी उपस्थित होते

For further information please contact: -


Vaidehi More

9028543087

Niti Tamse

8369727364/9664215544

vaidehi.more@mmrcl.com niti.tamse@mmrcl.com